सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १०२ | शुक्रवार, दि. २ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## अभीष्टचिंतन



**प्रा. डॉ. रवींद्र चौधरी**
उद्योजक तथा राजकीय नेते



**बापूसो. के. डी. पाटील**
उपाध्यक्ष धनदाई माता एज्युकेशन सोसायटी



**ॲड. तिलोत्तमा पाटील**
अमळनेर



**उदयबापू पाटील**
गायक तथा राजकीय नेते



**श्री. गौतम मोरे**
सामाजिक कार्यकर्ता तथा बिल्डर्स, अमळनेर

वरील मान्यवरांचे वाढदिवस 1 जानेवारी रोजी होते. मात्र, जागेअभावी आम्ही ते प्रसिद्ध करू शकलो नाहीत. ते आजच्या अंकात प्रसिद्ध केले आहेत.




अमळनेर : नगराध्यक्ष पदग्रहण सोहळ्याप्रसंगी बोलताना पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.



अमळनेर : जल्लोषपूर्ण विजयी मिरवणूक.






अमळनेर : दै. ग्लोबल महातेजचे वाचन करताना पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील.

# आता कोणावरच टिका नको; सर्वच आपले, ‘आय लव्ह यू अमळनेर’ म्हणा

## नगराध्यक्ष पदग्रहण सोहळ्यात ना. गुलाबभाऊंनी केले सर्वांचे ‘हृदयग्रहण’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जातीचा वापर करणारा गांडू असतो. काम करणाऱ्या माणसाला कोणतीच अडचण येत नाही. आपले-परके भेदभाव न करता सर्वांची कामे करा. आपण नगरपिते नसून, (स्व.) बाळासाहेबांना अभिप्रेत असलेले नगरसेवक आहोत याचे भान ठेवा. आपण जिंकलो आहोत. आता कोणावरही टिका करू नका. आता फक्त आय लव्ह यू अमळनेर म्हणा. त्याचे कारण म्हणजे आपण महायुतीचा विचार केला असता विजयी झालेले सर्वच नगरसेवक महायुतीचे आहेत. माझे तर भाजपशी लव्ह मॅरेजच आहे. पालिका विजयाचे पर्क्युलेशन पं. स. व जि. प. तही होईल. अनेकांनी मुस्लिमांना फक्त घाबरविण्याचे काम केले. काम झाल्यावर बिर्याणीतील तेज पत्त्याप्रमाणे मुस्लिमांना बाहेर फेकून बिर्याणी हजम केली. तुमची सर्व कामे करण्यासाठी मी कटीबद्ध आहे. डॉ. परीक्षित बाविस्कर आता आपला धंदा बुडाला. तुम्ही आता हॉस्पिटलप्रमाणे पालिकेलाही योग्य ती ट्रिटमेंट व डोस देऊन शिस्त लावावी, असे प्रतिपादन पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी गुरुवार, दि. १ जानेवारी रोजी येथे केले.

पालिकेच्या पदग्रहण समारंभप्रसंगी ते बोलत होते. नेहमी आक्रमक शैलीत व बिनधास्त खुन्नस देवून बोलण्यासाठी ना. गुलाबभाऊ प्रसिद्ध आहेत. यावेळी मात्र त्यांनी धरणगाव पालिकेच्या पदग्रहण समारंभप्रसंगी दिलेली उपस्थिती...त्यातून दाखविलेली उदात्तता व मनाचा मोठेपणा सोबतच भाषणातून सर्वांनाच केलेले भावनिक आवाहन यामुळे त्यांनी जणू सर्वांच्याच हृदयात आगळे-वेगळे स्थान निर्माण केले.

नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर यांनी विजय मिरवणुकीनंतर पालिकेत सोबतच्या नगरसेवकांसह, पालकमंत्री ना. गुलाबभाऊ, माजी आमदार शिरीषदादा चौधरी, प्रा. डॉ. रवींद्र चौधरी, ज्येष्ठ नेत्या ॲड. ललितताताई पाटील व काही मान्यवरांच्या साक्षीने पालिकेच्या दस्तवेजांवर स्वाक्षरी करून नगराध्यक्षपदाचा रितसर पदभार स्वीकारला.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून जल्लोषपूर्ण व मोठ्या उपस्थितीने निघालेली विजयी मिरवणूक लक्षवेधी ठरली.


माजी नगरसेवक प्रवीण पाठक यांनी प्रास्ताविक केले. चंद्रकांत कंखरे सर व माजी नगरसेवक गुलाब पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

### ग्लोबल महातेजचा बोलबाला

निवडणूक काळात ग्लोबल महातेजने अत्यंत संयमीत, पारदर्शक व समतोल पत्रकारिता केली होती. त्याचा कार्यक्रमाच्या प्रारंभापासूनच दोन- तीनदा उल्लेख झाला. बुधवार, दि. ३१ डिसेंबर रोजी ‘बोरी पात्राचा श्वास कोंडला’ या शिर्षकाखाली अत्यंत बोलका फोटो पुरेपूर मोठ्या आकारात व कलात्मकरित्या वापरला होता. त्याबाबतही शिरीषदादांनी भाषणातुन सांगितले, की आम्ही सदर बातमीची दखल घेतली आहे. नदीच्या स्वच्छता व सौंदर्यीकरणबाबतचा सुमारे ३०० कोटी रूपयांचा प्रस्ताव आम्ही शासन दरबारी सादर करीत आहोत. व्यासपीठावरील जवळपास सर्वच मान्यवरांनी व्यासपीठावरच ग्लोबल महातेजचे वारंवार वाचन केले.

### बाविस्करांना लाभले बावीस ‘कर’...!

पालिके बाहेरील जागेवर झालेल्या पदग्रहण तथा आभार प्रदर्शक कार्यक्रमप्रसंगी उपस्थित सर्व गटनेते, उपगटनेते, प्रतोद आदींचा परिचय करून देण्यात आला. डॉ. बाविस्कर यांच्यासोबत असलेले शिवसेनेचे व अपक्ष बावीसच्या बावीस कर (हात) व्यासपीठावर होते. यावेळी डॉ. बाविस्कर यांचे परिवार सदस्य, आप्तेष्ट, शिरीषदादा चौधरी यांच्या पत्नी सौ. अनितताई चौधरी, पुत्र प्रथमेश चौधरी व पुतणे गौरव चौधरी व माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील व माजी उपनगराध्यक्ष मोहन सातपुते व्यासपीठावर होते.



### कार्यक्रमातील काही वेचक- वेधक क्षण

पदग्रहण कार्यक्रमात जवळपास सर्वच वक्त्यांनी शेरो- शायरीचा मुक्तहस्ते वापर केला. नगरसेवक महेश देशमुख यांनी सन १९९१ला झालेल्या शिवसेनेच्या एका कार्यक्रमातील ना. गुलाबभाऊंचा फोटो दाखवून काही आठवणी जागविल्या. अमळनेरला शिवसेनेचा पहिलाच नगराध्यक्ष लाभल्याचा, रुपाली शिवदे यांच्या मोठ्या मताधिक्क्याचा, तीन पैकी दोन मुस्लिम उमेदवार धनुष्य बाणाच्या चिन्हावर निवडून आल्याचा, तर नगरसेवक श्रीराम चौधरी यांचा हास्य विनोदाने म्हातारा, तर गटनेता असलेला पंकज चौधरी हा पंडितनाना चौधरी यांचा सुपुत्र आहे. त्यामुळे त्याचा कायदेपंडित असा उल्लेख झाला. सुयोग ज्ञानेश्वर धनगर या अवघ्या २१ वर्षाच्या नगरसेवकाचा विशेष उल्लेख झाला. जिल्हाप्रमुख वासुदेव पाटील यांनी शिरीषदादांना विधानसभेत पोहोचविण्याचे आवाहन केले. उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांनी ना. गुलाबभाऊंच्या मोबाईलवरून डॉ. बाविस्कर यांचे केलेले अभिनंदन, भरीव निधी देण्याबाबत दिलेले अभिवचन माईकवरून सर्वांना ऐकविण्यात आले. नरगसेवक प्रशांत निकम यांनी शिरीषदादांना सुचविलेले शैक्षणिक बदल सांगण्यात आले.




“ आगामी काळात पालिकेचे भव्य हॉस्पिटल निर्मिती, उद्योगवृद्धी करणार. स्पर्धा परीक्षा तयारी केंद्र सुरू करेल. विकलांग माता- भगिनींसाठी भरीव प्रयत्न होतील. वॉर्डाच्या समस्या वॉर्डातच तत्काळ सोडविल्या जातील. ‘नगराध्यक्ष आपल्या दारी’ योजना सुरू करेल. नगराध्यक्ष म्हणून मिळणारे मानधन गोशाळा व सामाजिक संस्थांना देईल.
– **डॉ. परीक्षित बाविस्कर,** नगराध्यक्ष, अमळनेर.



“ आम्ही शिवसेनेच्या पक्षाच्या अधिकृत चिन्हावर लढलो. ‘ते’ दुसऱ्या चिन्हावर लढले. नगर पालिका तो सिर्फ पं. स. और झेड. पी. अभी बाकी है. शिरीषदादाच आमचे आमदार आहेत. पराभूत नगरसेवकांनी स्वतःला कमी लेखू नका. खरे तर विद्यमान आमदारांनी कबुल केल्याप्रमाणे तेही आता आपल्या सोबतच आहेत.
– **ॲड. ललितताताई पाटील,** ज्येष्ठ नेत्या.



“ अमळनेरकरांनी अहंकार जिरवला आहे. प्रामाणिक नेतृत्वाला न्याय दिला आहे. खरे तर येथील पालिकेच्या नव्या इमारतीचे निर्माणकार्य आमचे आहे. मात्र, आम्हाला तेथे पायही ठेवायला मिळाला नव्हता. येत्या महिनाभरामध्ये तुम्हाला भरपूर बदल पहावयास मिळतील. शिरीषदादांच्या आमदारकीच्या काळात व पालिकेवर आमची सत्ता असताना आम्ही चिरस्मरणीय विकासकामे केली आहेत.
**प्रा. डॉ. रवींद्र चौधरी,** अध्यक्ष, हिरा उद्योग समुह.



“ परिस्थिती जितकी बिकट असते शिवसैनिक तितका तिखट असतो. आजपासूनच अंत्यसंस्कारासाठी गौऱ्या मोफत मिळतील. ताडे नाल्याचे भव्य सुशोभिकरण करू. लवकरच धर्मवीर संभाजी महाराज व पांडुरंगाचाही भव्य पुतळा उभारू. लोकवर्गणी आजपासूनच बंद. प्रॉपर्टी टॅक्सवरील २ टक्के व्याजही रद्द होईल. माझे हे शेवटचे टिकात्मक भाषण आहे. आम्हाला स्वतंत्र लढण्याची परवानगी दिल्याबद्दल ना. गुलाबभाऊंचे आम्ही आभारी आहोत. आमचे दोन गट म्हणजे आमचीच एक ॲडजेस्टमेंट आहे. मी वजनाने जड असल्याने माझे पार्सल रवाना करणे विरोधकांना शक्य नाही.
– **शिरीषदादा चौधरी,** माजी आमदार, अमळनेर.

नववर्षाच्या सर्वांना मंगलमय शुभेच्छा!
खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर (जि. जळगाव)
त्रैवार्षिक निवडणूक - २०२५-२०२८
जाहीर नम्र विनंती
मतदान तारीख
रविवार, ता. ४/१/२०२६
सकाळी ८ ते सायं. ५ पर्यंत
मतदान ठिकाण
प्रताप कॉलेज,
अमळनेर, (जि.जळगाव)
कार्यकारी मंडळ सदस्य पदाच्या उमेदवार
अनुक्रमांक १२
निवडणूक चिन्ह : रिक्षा
लीना प्रवीण पाटील
अनुक्रमांक १२ समोरील रिक्षा या चिन्हावर फुलीचा शिक्का मारा



नववर्षाच्या सर्वांना मंगलमय शुभेच्छा!
खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर (जि. जळगाव)
त्रैवार्षिक निवडणूक - २०२५-२०२८
जाहीर नम्र विनंती
मतदान तारीख
रविवार, ता. ४/१/२०२६
सकाळी ८ ते सायं. ५ पर्यंत
मतदान ठिकाण
प्रताप कॉलेज,
अमळनेर, (जि.जळगाव)
कार्यकारी मंडळ सदस्य पदाचे उमेदवार
अनुक्रमांक १७
निवडणूक चिन्ह : कपाट
जितेंद्र शांतीलाल झाबक
अनुक्रमांक १७ समोरील कपाट या चिन्हावर फुलीचा शिक्का मारा




नववर्षाच्या सर्वांना मंगलमय शुभेच्छा!
खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर (जि. जळगाव)
त्रैवार्षिक निवडणूक - २०२५-२०२८
जाहीर नम्र विनंती
मतदान तारीख
रविवार, ता. ४/१/२०२६
सकाळी ८ ते सायं. ५ पर्यंत
मतदान ठिकाण
प्रताप कॉलेज,
अमळनेर, (जि.जळगाव)
अध्यक्ष पदाचे उमेदवार
अनुक्रमांक २
निवडणूक चिन्ह : पंखा
विनोद जगदीश अग्रवाल
अनुक्रमांक २ समोरील पंखा या चिन्हावर फुलीचा शिक्का मारा





# डिग्री का मोह छोड़ो, हुनर सीखो!



## रघुराम राजन ने चेताया, भारत नहीं कर रहा है ये काम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आरबीआई के पूर्व गवर्नर रघुराम राजन ने भारत की शिक्षा व्यवस्था पर चिंता जताई है। उन्होंने कहा कि एआई के इस दौर में भी प्लंबर जैसे हाथों से किए जाने वाले काम खत्म नहीं होंगे। लेकिन, भारत की शिक्षा प्रणाली बच्चों को ऐसे कामों के लिए तैयार नहीं कर रही है। राजन ने कहा कि हमें बच्चों को डिग्री के बजाय प्रैक्टिकल स्किल्स सिखाने पर ध्यान देना चाहिए।

रघुराम राजन ने एक पॉडकास्ट में कहा कि भारत एआई के भविष्य की ओर बढ़ रहा है। लेकिन, उसका वर्कफोर्स (काम करने वाले लोग) ठीक से प्रशिक्षित नहीं है। कई लोग तो कुपोषित भी हैं। उन्होंने कहा कि हमें इस बारे में सोचना होगा कि हम अपने युवाओं को काम के लिए कैसे तैयार करते हैं। हमें सिर्फ डिग्री पर नहीं, बल्कि प्रैक्टिकल स्किल्स पर ध्यान देना चाहिए। राजन ने कहा कि कुछ ऐसी जगहें हैं जहां काम की जरूरत है, जहां हाथों से काम करना पड़ता है। एआई के इस युग में भी प्लंबर का काम खत्म नहीं होगा।

**प्लंबिंग का दिया उदाहरण**

राजन ने प्लंबिंग और एयरक्राफ्ट इंजन रिपेयर जैसे कामों का उदाहरण दिया। उन्होंने कहा कि ये काम आज भी जरूरी हैं। इन्हें ऑटोमेशन से बदलना मुश्किल है। लेकिन, भारत की मौजूदा शिक्षा प्रणाली बच्चों को इन जरूरी कामों के लिए भी तैयार नहीं कर रही है। बच्चों को गणित, विज्ञान और कम्युनिकेशन जैसी बुनियादी चीजें नहीं सिखाई जा रही हैं।

उन्होंने इस सोच को भी गलत बताया कि सफलता के लिए सिर्फ डिग्री ही जरूरी है। राजन ने कहा, 'मुझे फ्रेंच या अंग्रेजी साहित्य में डिग्री की जरूरत नहीं है।' उन्होंने कहा कि वे मॉडर्न प्लंबिंग में टेक्निकल कोर्स करने में खुश होंगे।

**सिस्टम में बदलाव की जरूरत**

राजन ने कहा कि इस सोच को बदलने के साथ सिस्टम में भी बदलाव की जरूरत है। उन्होंने कहा कि ज्यादा से ज्यादा अप्रेंटिसशिप (प्रैक्टिकल ट्रेनिंग) होनी चाहिए। स्किल्ड ट्रेड (हुनर वाले काम) को ज्यादा सम्मान मिलना चाहिए। पढ़ाई का ऐसा सिलेबस होना चाहिए जिसमें थ्योरी के साथ प्रैक्टिकल भी सिखाया जाए। उन्होंने यह भी कहा कि प्लंबर बनने के लिए एंटरप्रेन्योरशिप (अपना काम शुरू करने का हुनर) भी चाहिए। आपको अपने काम की कीमत तय करनी आनी चाहिए और अपने खर्चों का हिसाब रखना आना चाहिए।

राजन ने सिर्फ स्किल्स की बात नहीं की। उन्होंने काम के लिए तैयार रहने और बचपन के विकास को भी जोड़ा। उन्होंने कहा, 'हम अपने कुछ बच्चों को बचपन में ही फेल कर रहे हैं।' उन्होंने कुपोषण का जिक्र किया। राजन ने चेतावनी दी कि जो बच्चे कुपोषण के कारण ठीक से विकसित नहीं हो पाते, वे भविष्य के कामों की शारीरिक और मानसिक मांग को पूरा नहीं कर पाएंगे।

उन्होंने कहा कि अगर हम २०४७ तक ' विकसित भारत ' बनना चाहते हैं तो हम अपने ३५ प्रतिशत वर्कफोर्स को ऐसी नाजुक स्थिति में नहीं रख सकते। कुपोषण को कम करना इस समस्या का हल निकालने का हिस्सा होना चाहिए।

# सेरेबल पाल्सी आजारावर मात करत पहिल्याच प्रयत्नात यूपीएससी पास

**मनवेंद्र सिंगची थक्क करणारी कहाणी**

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उत्तर प्रदेशमधील बुलंद शहरातील २४ वर्षांचा मनवेंद्र सिंग याने अशक्य वाटणारी गोष्ट करून दाखविली आहे. सेरेब्रल पाल्सी हा आजार असतानाही त्याने इंजिनिअरिंग सर्व्हिसेस परीक्षा २०२५ मध्ये पहिल्याच प्रयत्नात एआयआर ११२ मिळवून भारतीय अभियांत्रिकी सेवेत (आयईएस) पोस्ट मिळविली आहे.



मनवेंद्र अवघ्या सहा महिन्यांचा असताना त्याला सेरेब्रल पाल्सी असल्याचे निदान झाले होते. दोन वर्षांचा असताना त्याला मान सरळ धरताही येत नव्हती. हळूहळू शरीराची उजवी बाजू निकामी होत होती. साध्या-साध्या हालचालींसाठीही त्याला खूप प्रयत्न करावे लागत होते.

त्याची आई रेनू सिंग या बुलंद शहरामधील एका खासगी शाळेच्या मुख्याध्यापिका आहेत. त्या सांगतात, की आज यूपीएससी पास करणे मोठी गोष्ट वाटते. पण त्याचा खरा संघर्ष लहानपणापासून सुरू झाला होता. पेन्सील कशी धरायची, लिहियचे कसे, हे सगळे त्याने हळूहळू शिकून घेतले.

लहानपणी मनवेंद्र बोटांमध्ये पेन्सील धरू शकत नव्हता. तो ती मूठीत पकडून लिहायचा. अनेक वर्षांच्या सरावानंतर त्याने डाव्या हाताने लिहायची सवय लावून घेतली. डॉक्टरांनी सांगितले होते, की हा आजार आयुष्यभर सोबत राहील. त्याच्या आईने देशभरातील ५० हून अधिक डॉक्टरांकडे उपचार घेतले. शेवटी दिल्लीतील एका रुग्णालयात त्याची प्रकृती स्थिर झाली.

वयाच्या १७ व्या वर्षी मनवेंद्रला आणखी एक मोठा धक्का बसला. दीर्घ आजारानंतर त्याच्या वडिलांचे निधन झाले. या घटनेचा त्याच्यावर मानसिक परिणाम झाला. पण कालांतराने त्याने स्वतःला सावरले आणि कुटुंबाची जबाबदारी स्वीकारली. शिक्षणात मात्र तो नेहमीच हुशार होता. बारावीनंतर कुटुंबीयांनी सुरक्षित पर्याय म्हणून यूपी टेक्निकल एट्रन्स परीक्षा देण्याचा सल्ला दिला. पण मनवेंद्र ठाम होता. त्याला आयआयटीमध्येच जायचे होते.

त्याने गेट परीक्षेत एआयआर ६३ मिळविला आणि आयआयटी पाटणा येथून इलेक्ट्रॉनिक्स आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमध्ये बी.टेक पूर्ण केले. पदवीनंतर तो दिल्लीला गेला आणि इंजिनिअरिंग सर्व्हिसेस परीक्षेच्या तयारीला लागला. तीन टप्प्यांची ही परीक्षा असते. प्रिलिम्स, मेन्स आणि मुलाखत. शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या ही परीक्षा खूप कठीण असते. तरीही पहिल्याच प्रयत्नात मनवेंद्रने सर्व टप्पे पार केले आणि एआयआर ११२ मिळवून यश मिळविले.

या यशामुळे त्याची निवड रेल्वे, टेलिकॉम, पॉवरसारख्या केंद्र सरकारच्या तांत्रिक विभागांमध्ये होणार आहे. मनवेंद्रच्या आईसाठी हा फक्त एक निकाल नाही. त्या म्हणतात, की या यशामागचा प्रवास खूप मोठा आहे. अडचणी असूनही स्वप्ने पूर्ण करणे, हेच त्याचे खरे यश आहे. मनवेंद्र सिंगची ही कहाणी अनेकांसाठी प्रेरणा आहे.

# नववर्षाचा फटका बसणार?

## २०२६ मध्ये स्मार्टफोन १० ते १५ टक्क्यांनी महागणार? जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तुम्ही नववर्ष २०२६ मध्ये नवा फोन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर ही बातमी नक्की वाचा. २०२६ मध्ये नवीन मोबाइल फोन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना महागाईचा फटका बसू शकतो. ऑल इंडिया मोबाइल रिटेलर्स असोसिएशनने इशारा दिला आहे, की २०२५ मध्ये मेमरी घटकांच्या वाढत्या किंमती आणि वारंवार यूएसडी-आयएनआर चलनातील चढ-उतारांमुळे किमतींमध्ये अंदाजे १० टक्के वाढ झाल्यानंतर २०२६ मध्ये भारतातील स्मार्टफोनच्या किंमती आता आणखी १० ते १५ टक्क्यांनी वाढू शकतात. चला तर मग याविषयीची माहिती जाणून घेऊया.

एका माध्यमातील वृत्तानुसार असोसिएशनने म्हटले आहे, की वाढत्या किमतीच्या दबावामुळे स्मार्टफोन निर्मात्यांसाठी अस्थिर वातावरण निर्माण झाले आहे. अहवालानुसार ऑल इंडिया मोबाइल रिटेलर्स असोसिएशनचे अध्यक्ष कैलाश लखानी म्हणतात की आम्ही एक बदल पाहत आहोत जिथे घटकांच्या किमती आता स्थिर नाहीत. ते म्हणाले, की रियलमी, शाओमी, ओप्पो आणि विवो सारख्या मोठ्या ब्रँडने यापूर्वीच फास्ट सेलिंग मॉडेल्सच्या किंमती वाढवल्या आहेत.

रिपोर्टनुसार शाओमी, रियलमी, विवो आणि ओप्पो सारख्या आघाडीच्या ब्रँड्सना यापूर्वीच फास्ट सेलिंग मॉडेल्सच्या किंमती वाढवण्यास भाग पाडले गेले आहे. काही ब्रँड्सनी थेट एमआरपीमध्ये वाढ केली आहे, तर काहींनी बँक कॅशबॅक बंद करून, शून्य-व्याज ईएमआय योजना काढून टाकल्या आहेत आणि किरकोळ विक्रीचे समर्थन कमी केले आहे.

रिपोर्टनुसार एआयएमआरएच्या अध्यक्षांनी शाओमीचे उपाध्यक्ष आणि रियलमीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह हाँगकाँगमधील जागतिक टेक नेत्यांची भेट घेतली. या बैठकीत भारतीय स्मार्टफोन बाजाराच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे.



### रिटेल क्षेत्रावर दबाव

एआयएमआरएने म्हटले आहे की, दिवाळीपासून ग्राहकांच्या संख्येत मोठी घट झाल्याने मेनलाइन रिटेल मार्केटवर त्याचा परिणाम खूप मोठा झाला आहे. ऑल इंडिया मोबाइल रिटेलर्स असोसिएशन आणि ऑर्गनाइज्ड रिटेलर्स असोसिएशन या दोघांच्या मते, नोव्हेंबर आणि सप्टेंबरच्या तुलनेत डिसेंबरमध्ये विक्री कमी होत आहे, ज्यामुळे अनेक लहान आणि मोठ्या किरकोळ विक्रेत्यांना कर्मचाऱ्यांचे वेतन द्यावे लागत आहे आणि कमी विक्रीमुळे त्यांच्या खिशातून भाडे साठवावे लागत आहे.

### महागाईचा परिणाम कसा टाळता येईल?

अनेक लोकांच्या मनात हा प्रश्न येईल की २०२६ मध्ये स्मार्टफोनच्या वाढत्या किंमती टाळण्यासाठी काय करावे? वाढत्या किमती टाळण्यासाठी २०२५ मध्येच नवीन फोन खरेदी करून महागाईचा परिणाम टाळता येईल.

# नसांमध्ये साचलेले युरिक ॲसीड पडेल शरीराच्या बाहेर

## 'या' पानाचे सेवन केल्यास लवकरच होईल संधिवात दूर



काटेरी नाशपाती



नागफणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शरीरात युरिक ॲसीडचे प्रमाण वाढल्याने अनेक आरोग्य समस्यांचा धोका वाढतो. ही एक अशी समस्या आहे, जी एकदा वाढली, की नियंत्रित करणे खूप कठीण होते. युरिक ॲसीडचे प्रमाण वाढल्याने किडनी स्टोन, गाऊट व सांधेदुखी यांसारख्या गंभीर आणि वेदनादायक समस्या उद्भवू शकतात. काटेरी नाशपाती व नागफणी ही ओपंटिया प्रजातीची सदस्य वनस्पती युरिक ॲसीड नियंत्रित करण्यासाठी खूप प्रभावी आहे. आयुर्वेदतज्ज्ञ आचार्य बाळकृष्ण यांनी नागफणीचे फायदे स्पष्ट केले आहेत.

**नागफणीचे फायदे**

आचार्य बाळकृष्ण यांच्या मते नागफणी आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. त्याचे सेवन केल्याने अनेक आजारांपासून बचाव होऊ शकतो, ज्याला काटेरी नाशपाती, असेही म्हणतात. ही आयुर्वेदात अनेक आजारांवर उपचार करण्यासाठी वापरली जाणारी एक औषधी वनस्पती आहे.

**लघवीच्या समस्या होतील दूर**

आचार्य बाळकृष्ण यांच्या मते ज्यांना लघवीचा त्रास आहे त्यांनी ४ ते ५ ग्रॅम नागफणी रूट, १ ग्रॅम मेथी, १ ग्रॅम सेलेरी व १ ग्रॅम सुके आले ४०० ते ५०० मि.ली. पाण्यात उकळावे. जेव्हा ते द्रावण फक्त १०० मि.ली. उरते तेव्हा ते गाळून प्यावे. या औषधी द्रावणाचे सेवन केल्याने वाताशी संबंधित आजारांपासून आराम मिळेल. त्याशिवाय ज्यांना नुकताच संधिवाताचा त्रास सुरू झाला आहे त्यांचा संधीवात थांबण्यासही मदत मिळू शकते.

**युरिक ॲसीड नियंत्रित**

आचार्य बाळकृष्ण यांच्या मते एकदा शरीरात युरिक ॲसीडची पातळी वाढली, की ती हळूहळू वाढत राहते. जरी बरेच लोक इतर उपायांनी युरिक ॲसीडची पातळी नियंत्रित करीत असले, तरी ती वारंवार वाढते. अशा परिस्थितीत हा उपाय युरिक ॲसीडची पातळी नियंत्रित करण्यास मदत करू शकतो. काटेरी नाशपातीमध्ये अँटीऑक्सिडंट्स व फायबर असतात, जे शरीरातील विषाक्त घटक बाहेर काढण्यास मदत करतात. ते मूत्रपिंडाचे कार्यदेखील सुधारते. ज्यामुळे युरिक ॲसीड पातळी संतुलित होण्यास मदत मिळते.

**जळजळ होण्यापासून आराम**

ज्यांना शरीरावर सूज किंवा शरीरदुखीचा त्रास आहे त्यांनी नागफणीची तीन ते चार मुळे, एक ग्रॅम सुके आले, एक ग्रॅम सेलेरी व एक ग्रॅम मेथी उकळवून तयार केलेला काढा घ्यावा. त्यामुळे सूज लवकर दूर होईल. नागफणीत दाहकविरोधी गुणधर्म असतात, जे संधीरोग आणि सांध्यांची जळजळ कमी करण्यास मदत करतात.

युरिक ॲसीड हा आपल्या अन्नातील प्युरिनच्या विघटनामुळे तयार होणारा पदार्थ आहे. अनेक पदार्थ आणि पेयांमध्ये प्युरिन जास्त प्रमाणात आढळते. ज्यामुळे युरिक ॲसीडची पातळी वाढण्याचा धोका वाढू शकतो. म्हणूनच आपण आपल्या आहाराबद्दल विशेषतः काळजी घेतली पाहिजे आणि जास्त प्युरिन असलेल्या पदार्थांचे मर्यादित प्रमाणातच सेवन केले पाहिजे. सफरचंद खाल्ल्याने युरिक ॲसीड नियंत्रित होण्यास मदत होते. सफरचंदांमध्ये मॅलिक ॲसीड असते, जे आपल्या रक्तातील युरिक ॲसीडची पातळी नियंत्रित करण्यास मदत करते.

# जगातील सर्वांत महागडी भाजी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेव्हा जेव्हा आपण महागड्या खाद्यपदार्थांबद्दल बोलतो तेव्हा आपल्या मनात फक्त सोन्याचा वर्ख असलेली मिठाई किंवा महागड्या फळांचा गोडवा समोर येतो. परंतु अशा काही भाज्या देखील आहेत ज्या इतक्या दुर्मिळ आणि मौल्यवान आहेत, की त्यांची किंमत लक्झरी घड्याळांशी स्पर्धा करू शकते. हॉप शूट ही जगभरातील सर्वांत महागड्या भाज्यांपैकी एक आहे. तिची किंमत ८५ हजार ते १ लाख रुपये प्रतिलोपर्यंत असू शकते.

या भाजीची लागवड करणे कठीण असते. ही रोपे सरळ ओळीत वाढत नाहीत. त्यामुळे यंत्राने कापणी करणे अशक्य होते. शेतकऱ्यांना प्रत्येक हॉप शूट स्वतंत्रपणे शोधावे लागेल आणि तोंडावे लागेल. या संपूर्ण प्रक्रियेस बराच वेळ आणि मेहनत लागते. १ किलो गोळा करण्यासाठी शेकडो हॉप शूटची आवश्यकता आहे. हे खूप महाग



आहे. कारण त्यात ह्युमुलोन आणि ल्युपोलोनसारख्या नैसर्गिक आम्लांचा समावेश आहे.

हे दोन्ही आम्ल कर्करोगाच्या पेशी आणि टीबीसारख्या आजारांशी लढायला मदत करू शकतात. गुच्ची मशरूम ही देखील नैसर्गिकरीत्या उद्भवणारी सर्वांत महाग भाजी आहे. जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशच्या जंगलात आढळणाऱ्या या भाजीची किंमत प्रतिकिलो ३० हजार ते ४० हजार रुपये दरम्यान आहे. हे इतके महाग आहे. कारण त्याची लागवड केली जाऊ शकत नाही. गुच्ची मशरूम केवळ विशेष नैसर्गिक परिस्थितीतच वाढतात. बर्फवृष्टी आणि वादळानंतर हे सहसा थंड डोंगराळ भागात वाढते.


# 'धुरंधर'सारखा चित्रपट बनवणे सर्वांत मोठा मूर्खपणा

**प्रसिद्ध दिग्दर्शकाचे वक्तव्य चर्चेत!**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

धर्मेंद्र यांचा शेवटचा 'इक्कीस' हा चित्रपट गुरुवार, दि. १ जानेवारी प्रदर्शित झाला आहे. अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर पदार्पण करत आहे. या चित्रपटात त्याच्यासोबत सिमर भाटिया आणि जयदीप अहलावत यांच्याही भूमिका आहेत.

आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर' या चित्रपटाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यादरम्यान 'इक्कीस' या चित्रपटाचे दिग्दर्शक श्रीराम राघवन यांनी म्हटले आहे, की 'धुरंधर' हा त्यांच्या प्रकारचा चित्रपट नाही. त्यांना



आदित्य धरची शैली फॉलो करायची नाही. 'धुरंधर'सारखा चित्रपट बनवणे हे मूर्खपणाचे काम असेल.

एका मुलाखतीत श्रीराम राघवन यांना विचारण्यात आले की, 'धुरंधर' आणि त्यांचा भाऊ श्रीधर राघवन यांनी बनवलेल्या स्पाय चित्रपटांमध्ये काय फरक आहे? त्यावर ते म्हणाले, हा एक उत्तम चित्रपट आहे, ज्यामध्ये कलाकारांनी उत्तम अभिनय केला आहे. मात्र, तो आमच्या प्रकारचा चित्रपट नाही. आपल्याला हे समजून घेतलं पाहिजे की आपण एका वेगळ्या युगात राहतो. शॉन कॉनरी आणि रॉजर मूर अभिनित जेम्स बाँडचे सुरुवातीचे चित्रपट मनोरंजक होते. नंतर बाँडचे चित्रपट अधिक गंभीर झाले. 'धुरंधर' हा एक वेगळ्या प्रकारचा चित्रपट आहे. तो बॉक्स ऑफिसवर उत्कृष्ट कामगिरी करतोय आणि करायलाही हवा. पण तो एकमेव फॉरमॅट नाही. जर मी त्याचे अनुकरण केले तर ते करणे सर्वात मूर्खपणाचे काम ठरेल. आदित्य धर आणि मी राष्ट्रीय पुरस्कारांचे व्यासपीठ शेअर केले होते. जेव्हा त्याने 'उरी' हा चित्रपट बनवला होता आणि मी 'अंधाधून' हा चित्रपट बनवला होता. त्याची संवेदनशीलता आणि कलात्मकता वेगळी आहे आणि मला त्याचे चित्रपट पहायला आवडते. मात्र, त्याच्यासारखे चित्रपट मी बनवणार नाही. धरमजींसोबत अभिनयाचा कोणताही मागमूसच नव्हता. म्हणजे त्यांचे वर्तन, त्यांची शैली हे सर्व काही त्या पात्राचा भागच होते. ते कथेशी खोलवर जोडले गेले होते. पंजाबमधील त्यांचे घर सोडण्याचे दुःख त्यांच्या मनात वर्षानुवर्षे रुजले होते. घरी परतण्याचा विचार त्यांच्यासाठी एक खोल वैयक्तिक अनुभव बनला. त्या पात्रात ते पूर्णपणे बुडाले होते. ते अक्षरशः ते पात्र जगत होते. त्यांना संवादांची सखोल समज होती आणि ते कमी शब्दांच्या वापराला अधिक महत्त्व देत होते. मी त्यांना संवाद लिहून दिले पण ते कसे म्हणायचे याबद्दल ते नेहमी माझा सल्ला विचारायचे. त्यात ते कधी स्वतःहून बदल करायचे आणि चित्रपटात मी त्यांनी सुचवलेल्या अनेक ओळी वापरल्यासुद्धा आहेत. आम्ही अनेकदा त्यांच्या कवितांवर चर्चा करायचो. मला त्यांच्या कविता प्रकाशित करायच्या होत्या. मात्र, त्यांना घाई नव्हती. मी त्यांना चित्रपटासाठी त्यांची एक रचना वाचून दाखवण्याची विनंती केली आणि ते खूप सुंदर होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

## प्रकाशन सोहळा...!



अमळनेर : गुरुवार, दि. १ जानेवारी रोजी लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांचा पदग्रहण सोहळा, तसेच नववर्षानिमित्त नवनियुक्त नगरसेवकांकडून जनतेचे आभार, शुभेच्छा या पार्श्वभुमीवर दै. ग्लोबल महातेजतर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंकाचे श्री मंगळ ग्रह मंदिरात प्रकाशन करताना लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, सौ. अश्विनी बाविस्कर, संजय बाविस्कर, डॉ. सौ. हिनाताई महाले- ठाकरे, राजू परदेशी, नरेश साळी, विजय चौधरी, संतोष पाटील, आशिष चौधरी, वासुदेव पाटील व मंगळ ग्रह सेवा संस्थेचे जनसंपर्क अधिकारी शरद कुळकर्णी आदी.



अमळनेर : श्री हनुमानांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून कुस्ती निवड चाचणी स्पर्धेचे उद्‌घाटन करताना नगरसेवक प्रवीण पाटील, संजय पाटील, रावसाहेब पहेलवान आदी.

# तालुका कुस्तीगीर संघातर्फे निवड चाचणी स्पर्धा

## जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी विविध गटातील २७ जणांची निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुका कुस्तीगीर संघातर्फे कुस्तीपटूंची निवड चाचणी स्पर्धा येथील तालुका क्रीडा संकुलात नुकतीच झाली. नगरसेवक प्रवीण पाटील व संजय पाटील यांच्या हस्ते श्री हनुमानाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून निवड चाचणी स्पर्धेचे उद्‌घाटन झाले.

नगरसेवक सचिन पाटील, सयाजीराव पाटील, प्रताप शिंपी यांच्या हस्ते आखाडा पूजन करण्यात आले. याप्रसंगी तालुका कुस्ती संघाचे बाळू पाटील, माजी नगरसेवक संजय कौतिक पाटील, रावसाहेब पहेलवान, शब्बीर पहेलवान, भरत पवार आदी उपस्थित होते.

निवड झालेले स्पर्धक असे : १५ वर्ष मुले फ्री स्टाईल- नमन योगेश मनोरे (४१ किलो), हसन शेख सादीक (४४ किलो), यश अशोक धनगर (४८ किलो), तुषार अशोक पाटील (५२ किलो). १५वर्षा आतील ग्रीक रोमन गट- चेतन अमृत पाटील (४४ किलो), १७ वर्षा आतील मुली- प्रज्ञा मगनलाल संदानशीव (५३ किलो) जयश्री अरविंद विरकर (५७ किलो). २० वर्षा आतील ग्रीक रोमन मुले गट- प्रतिक दीपक पाटील (६० किलो), मुकेश शालीक बाविस्कर (६३ किलो). २० वर्षा आतील फ्री स्टाईल गट- शैलेश चंद्रकांत माळी (५७ किलो), राहुल विलास राजपुत (६१ किलो), पवन मोहन पाटील (६५ किलो), तरूण कुमार रामेश्वर चिते (७० किलो), भाग्येश सुनिल जाधव (७४ किलो). महाराष्ट्र केसरी गादी गट- अजय बापु धनगर (५७ किलो), ईश्वर भिल (६१ किलो), योगराज चौधरी (६५ किलो), संदीप सुरेश पाटील (७४ किलो), हर्ष प्रताप शिंपी, सिध्देश रविंद्र आहीरे (८६ किलो), निजाम अली सैय्यद (९२ किलो). महाराष्ट्र केसरी माती गट- जयेश राजेंद्र पाटील (५७ किलो), मयूर दीपक पाटील (६१ किलो), शुभम विनायक शिंदे (८६ किलो). वरीष्ठ ग्रीकरोमन गट- रूतिक यशवंत पाटील (५५ किलो), भावेश दिलीप कोळी (६० किलो), ऋषिकेश विलास पाटील (८६ किलो). या विजयी पहेलवानांची निवड जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. पंच म्हणून प्रवीण पाटील व हसन पहेलवान यांनी काम पाहीले. पवन शिंपी, योगेंद्र चौधरी, निजाम पहेलवान व भावेश कोळी यांनी सहकार्य केले.

# प्रत्येक गुन्ह्यात ई-साक्ष बंधनकारक

## विनायक कोते; अमळनेर येथे पोलिसांची कार्यशाळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : प्रत्येक गुन्ह्यात ई साक्ष नोंदवून घ्यावी. गुन्हा दाखल नसला तरी घटनास्थळी फोटो आणि व्हिडीओ काढून ठेवा. नवीन कायद्यानुसार ई साक्ष आवश्यक आहे. आणि दोषारोप पत्र ६० ते ९० दिवसात दाखल झालेच पाहिजे. वैद्यकीय तपासणी करण्यासाठी आता वेळ मर्यादित आहे, अशी माहिती पोलीस उपअधीक्षक विनायक कोते यांनी दिली.

येथील पोलीस ठाण्यातर्फे नवीन भारतीय न्याय संहिता २०२३ बाबत बुधवार, दि. ३१ डिसेंबर रोजी पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्यशाळेत ते बोलत होते. सरकारी वकील ॲड. किशोर बागुल व ॲड. राजेंद्र निकम व्यासपीठावर होते.



श्री. कोते पुढे म्हणाले, की नवीन न्याय संहिता पोलीसांनी समजून घेणे गरजेचे आहे. गुन्हा नोंद करताना सर्व बाबींची पडताळणी करून गुन्हा दाखल करावा. गुन्ह्याची पार्श्वभूमी जाणून घ्यावी. यावेळी सरकारी वकील ॲड. किशोर बागुल म्हणाले, की सरकारी पंच नेताना त्यांचे आय. डी. कार्ड असणे आवश्यक आहे. नवीन बी. एन. एस. कायद्यात शिक्षा वाढविण्यात आल्या आहेत. साक्ष कायद्यात बदल झाला आहे. फसवणुकीच्या गुन्ह्यात आरोपीच्या अटकेची कारणे देताना रक्कम वसुलीची गरज असल्याचे नमूद पाहिजे. अन्यथा आरोपींना जामीन मिळतो. पूर्वी विनयभंगाचा गुन्हा कनिष्ठ न्यायालयात चालायचा आता तो सेशन कोर्टात चालतो. ॲड. राजेंद्र निकम म्हणाले, की पूर्वीच्या आयपीसी मध्ये ५११ कलम होते. 'अ' सुधारणा करून बीएनएसमध्ये ३४३ कलम नवीन कायद्यात आरोपीला त्याचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी दिली आहे. दोषारोप स्पष्ट असले पाहिजे. खुनाच्या गुन्ह्यात खुनाची कारणे दिलीच पाहिजेत. याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक भगवान शिरसाठ, पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज, उपनिरीक्षक रामकृष्ण कुमावत, प्रशांत पाटील, सिद्धांत शिसोदे, राहुल पाटील, मिलिंद सोनार, विनोद सोनवणे, उज्वल म्हस्के, विनोद भोई, चंद्रकांत पाटील , विनोद संदानशीव, उज्वल पाटील, श्रीकांत शिंपी, काशिनाथ पाटील, गणेश पाटील, हर्षल पाटील, योगेश बागुल, नितीन मनोरे, देशमाने, नम्रता जरे श्यामल पारधी यांच्यासह सुमारे ८० पोलीस कर्मचारी उपस्थित होते. संजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

# अमळनेरला सावित्रीबाई फुले

## महिला महोत्सवाचे आज उद्‌घाटन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिका व महिला मंच ट्रस्टतर्फे महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सावित्रीबाई फुले महिला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. २ जानेवारी रोजी दुपारी साडेतीन वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात महिला महोत्सवाचे उद्‌घाटन होणार आहे. या पार्श्वभूमीवरर महिला मंचच्या पदाधिकाऱ्यांनी महोत्सवाच्या रुपरेषेबाबत बुधवार, दि. ३१ डिसेंबर रोजी पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे.

या महोत्सवात शुक्रवारपासून श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात सावित्रीबाई फुले महिला महोत्सव रंगणार आहे. रविवार, दि. ४ जानेवारीपर्यंत चार दिवस महिलांसाठी भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. दरम्यान, २४ डिसेंबर पासून घरगुती गच्चीवरील परसबॅग स्पर्धा, पोत्यात पाय ठेऊन चालणे, गीता वाचन स्पर्धा, पाककृती स्पर्धा, १० मिनिटात म्हणी लिहण्याची स्पर्धा, अमळनेर पोलीस ठाण्यातर्फे वॉकेथान स्पर्धा, मॅरेथॉन स्पर्धा आदी स्पर्धा ३१ डिसेंम्बरपर्यंत उत्साहात पार पडल्या. यास महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभल्याचे महिला पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

### महिलांसाठी खास पर्वणी!



अमळनेर : सावित्रीबाई फुले महिला महोत्स्वाबाबत पत्रकार परिषदेत माहिती देताना महिला मंचच्या अध्यक्षा डॉ. अपर्णाताई मुठे शेजारी सौ.तिलोत्तमाताई पाटील, प्रा. शिलाताई पाटील, सौ. वसुंधराताई लांडगे, श्रीमती माधुरीताई पाटील, सौ. विद्याताई हजारे आदी.

चार दिवस भरगच्च कार्यक्रम महोत्सवा दरम्यान २ जानेवारी रोजी सकाळी ९ ते ११ पोस्टर रांगोळी स्पर्धा, दुपारी साडेतीन वाजता महिला महोत्सवाचे उद्घाटन, खाऊ गल्ली तथा स्टॉलचे उद्घाटन होईल. शनिवार, दि. ३ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता नाट्यप्रवेश स्पर्धा होईल. रविवार, दि. ४ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता एकल व समूह नृत्य स्पर्धा होईल. तर सोमवार, दि. ५ जानेवारी रोजी दुपारी साडेतीन वाजता जाहिरात सादरीकरण स्पर्धा, प्रमुख पाहुण्यांचे स्वागत मनोगत तसेच सौ. रंजना पवार गवांदे यांचे महिला व अंधश्रद्धा या विषयावर व्याख्यान होईल. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण होणार आहे. आनंद मेळावा स्टॉल आकर्षण महोत्सवात आनंद मेळावा, स्टॉल खाऊ गल्ली, फॅशन बाजार, आकर्षक रुप श्रृंगार, परिधान, बाल गोपाळांकरीता गेम झोन सर्व नागरिकांसाठी खुले राहतील. सर्वांनी रुचकर, चटपटीत खाद्यपदार्थांचाही पुरेपूर आस्वाद घ्यावा. सर्व स्टॉल चारही दिवस दिवसभर सुरू राहतील.

महिलांनी मोठ्या संख्येने महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, मुख्याधिकारी गणेश शिंदे, महिला मंच ट्रस्टच्या अध्यक्षा डॉ. अपर्णा मुठे, उपाध्यक्षा तिलोत्तमा पाटील, सचिव सरोज भांडारकर, कोषाध्यक्ष कांचन शहा, श्रीमती भारती गाला, सौ. पद्मजा पाटील, सौ. वसुंधरा लांडगे, सौ. विजया देसर्डा, सौ. उज्वला शिरोळे, सौ, करुणा सोनार, डॉ. प्रा. सौ. रंजना देशमुख, प्रा. सौ. शीला पाटील, सौ. विद्या हजारे, श्रीमती माधुरी पाटील यांनी केले आहे.



अमळनेर : चोपडा रस्त्यावरील संरक्षक कठडे नसलेला नाला.
(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

## निकम यास तीन दिवस पोलीस कोठडी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खंडणी प्रकरणातील आरोपी अनंत निकम यास ३१ डिसेंबर रोजी पोलिसांनी अटक केली होती. त्याला १ जानेवारी रोजी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयने निकम यास ३ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# अमळनेर- चोपडा रस्त्यावरील नाल्यावर संरक्षक कठडे बसवावेत

## नागरिकांसह प्रवाशांची मागणी; गंभीर अपघातांचा धोका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर ते चोपडा रस्त्यावरील पहिलाड नाका ते श्री मंगळग्रह मंदिर रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यालगत असलेल्या नाल्याला अद्यापही संरक्षक कठडे बसविलेले नाहीत. परिणामी वाहने घसरून अपघातांचा धोका वाढला आहे. पालिकेने गांभिर्याने लक्ष घालून हे संरक्षक कठडे बसवावेत, अशी मागणी नागरिकांसह प्रवाशांनी केली आहे.

अमळनेर- चोपडा रस्ता नेहमीच मोठ्या वर्दळीचा आहे. या मार्गावरून शेकडो वाहने रोज ये- जा करतात. मात्र, रस्त्याची दयनीय अवस्था पाहाता प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. मोठ्या गटारी खोल आहेत, तर रस्ता उंचावर येतो. या गटारींवर ढापे बसविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे वाहने गटारीत पडून अनेक किरकोळ अपघातही घडले आहेत. फरशी पुलापर्यंतच्या कडेला मोठा नालाही आहे. मात्र, या नाल्याला संरक्षक कठडे नाहीत. तसेच या नाल्यावर मोठ्या प्रमाणात काटेरी झाडेझुडपे वाढले आहेत. वाहनधारकांना अंदाज येत नसल्याने वाहने नाल्यात पडतात. यासाठी सूचना फलक, रिफ्लेक्टर बसविणणे गरजेचे आहे. रात्री प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागतो. काही दिवसांपूर्वी याच ठिकाणी अपघात झाला होता. दुचाकीस्वार रस्त्याचा अंदाज न आल्याने थेट नाल्यात जाऊन पडला होता. सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.









## कर्मयोग कशाला म्हणतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण गणेशोत्सवात गणपतीबाप्पांची मूर्ती घरात आणतो. रोज प्रेमाने पूजा-अर्चा, उपचार करतो. आरती, प्रसाद करतो. अगदी प्रसन्न वातावरण असते. या दहा दिवसांमध्ये गणपतीबाप्पा म्हणजे आपल्या घरातील एक व्यक्ती होऊन जाते. म्हणून नंतर गणपतीबाप्पांच्या मूर्तीचे विसर्जन करतो तेव्हा वाईट वाटते. परंतु हे दुःख अगदी थोड्यावेळचे. नंतर मोकळ्या मनाने घरी येऊन आपल्या नेहमीच्या उद्योगाला लागतो. तसे आपल्याला या देहाविषयी वाटायला लागेल त्यावेळी खऱ्या अर्थाने कर्मयोग होतो. या देहालाही गणपतीबाप्पांप्रमाणेच एक दिवस सोडून द्यायचे आहे, या जाणिवेने त्याला आवश्यक तेवढे उपचार करणे हाच खरा कर्मयोग आहे.

कर्म कसे करावे याविषयी श्री ज्ञानेश्वर महाराज सांगतात, की ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार वर्णांपैकी आपल्या वाट्याला जे आले असेल ते कर्म करणे. परंतु त्याहीपेक्षा एक मोठा वेगळा भाग आहे आणि तो म्हणजे घरातील व्यक्तींबरोबर आपले जे विविध नातेसंबंध असतात त्याला अनुसरून त्यांच्या बाबतीतील आपले कर्तव्य, कोणतीही अपेक्षा न ठेवता पार पाडणे म्हणजे खरा कर्मयोग आहे. अशी ही कर्मे करताना केवळ कर्तव्य भावना न ठेवता यांची सेवा म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराची सेवा, हा भाव ठेवावा. कारण तो सर्वांच्या अंतःकरणात आहे. म्हणून " तथा सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमांची वीरा । पूजा केली होय अपारा । तो बाळागी ।। " ही परमेश्वराविषयीची अंतःकरणात निर्माण होणारी जी जाण आहे, ती चारही वेदांनी दिलेली आहे.

" रंगी को नारंग कहे । बने दूध का खोया । चलती को गाडी कहे । देख कबीरा रोया ।। " कणाकणांत परमेश्वर भरलेला असूनही विज्ञानाद्वारे देव नाही असे सिद्ध करू पाहतो... निसर्गात ज्या सगळ्या गोष्टी आहेत त्या कशा नियमाने चालतात हे पाहावे. तसेच आपल्या देहातही रोजच्या रोज सगळ्या गोष्टी कशा नेमाने आपल्या नकळत होतात, हे लक्षात घेतले, तर ईश्वराचे अस्तित्व पटू लागते. मात्र त्याकरिता बुद्धीला चालना देऊन वेगळ्या प्रकारे बघायला शिकले पाहिजे.

## श्री शाकंभरी देवी नवरात्रोत्सव

# संकटांवर मात करून सृष्टीला जीवनदान देणारी देवी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय अध्यात्मिक परंपरेत श्री शाकंभरी देवी ही अन्न, वनस्पती आणि सृष्टीच्या पालनाची अधिष्ठात्री मानली जाते. शाकंभरी म्हणजे " शाकांनी अन्नधान्य व वनस्पतींनी जगाचे पोषण करणारी देवी." दुष्काळ, उपासमार आणि नैसर्गिक संकटांवर मात करून सृष्टीला जीवनदान देणारी ही देवी करुणेचे साक्षात रूप आहे. पुराणकथेनुसार दीर्घकाळ चाललेल्या भयंकर दुष्काळामुळे पृथ्वीवर अन्नधान्याचा अभाव निर्माण झाला होता. त्या वेळी देवीने शाकंभरी रूप धारण करून आपल्या शरीरातून विविध प्रकारची धान्ये, शाकभाजी, फळे व औषधी वनस्पती निर्माण केल्या आणि सृष्टीचे रक्षण केले. त्यामुळेच तिला शाकंभरी माता व अन्नपूर्णा असे गौरविले जाते.



शाकंभरी देवीचे स्वरूप अत्यंत सौम्य, वात्सल्यपूर्ण व मंगल आहे. हातात धान्य, फळे व शाकभाजी धारण केलेली माता मानवाला कृतज्ञतेचा संदेश देते. अन्न हे केवळ पोट भरण्याचे साधन नसून, ते ईश्वरकृपेचे प्रतीक आहे, हे शाकंभरी माता सतत स्मरण करून देते. म्हणूनच तिची उपासना ही अन्नाचा सन्मान करण्याची शिकवण देते.

शाकंभरी नवरात्रोत्सव हा विशेष श्रद्धेने साजरा केला जातो. या काळात देवीची विधिवत घटस्थापना, अभिषेक, आरती, जप व भजन केले जातात. अनेक ठिकाणी अन्नदान, धान्यदान व गरजूंसाठी सेवा उपक्रम राबविले जातात. हा उत्सव केवळ धार्मिक नसून सामाजिक आणि मानवी मूल्यांना जपणारा आहे. शेतकरी, कष्टकरी आणि निसर्गाशी जोडलेले समाजघटक शाकंभरी मातेची विशेष भक्ती करतात. पाऊस, पीक, अन्नधान्य आणि आरोग्य यासाठी तिच्या चरणी प्रार्थना केली जाते. आजच्या बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शाकंभरी मातेची उपासना ही निसर्गसंवर्धनाचा संदेश देणारी ठरते. शाकंभरी नवरात्रोत्सव आपल्याला साधेपणा, कृतज्ञता आणि सेवा यांचे महत्त्व शिकवतो. देवीची कृपा म्हणजे केवळ समृद्धी नव्हे, तर मानव आणि निसर्ग यांच्यातील संतुलन राखण्याची जाणीव आहे.

## भगवंताची दृष्टी सर्वदूर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महेशचे एका देवळासमोर घर होते. पहाटेच लोक मंदिरात यायला लागायचे. एक दिवस महेश उठून पाहतो तर काय? रस्त्यावर असलेल्या त्याच्या गाडीला मागून कोणीतरी धडक दिलेली. चडफडत महेश गाडीजवळ गेला. किती नुकसान झाले आहे ते बघायला. तर काचेवर अडकवलेल्या एक चिठ्ठीत एक नाव आणि फोन नंबर लिहिलेला होता आणि फोन करण्यास सांगितले होते. त्याने त्या नंबरवर फोन लावला. पलीकडचा माणूस म्हणाला, की मी वाटच पाहत होतो तुमच्या फोनची. तुमच्या गाडीला धडक देणारा मीच. मी काकड आरती करून बाहेर आलो. चुकीचा गिअर पडल्यामुळे गाडी मागे जाण्याऐवजी पुढे गेली आणि तुमच्या गाडीवर आदळली. पहाटे तुम्हाला त्रास म्हणून चिठ्ठी ठेवली. मी तुमचे सगळे नुकसान भरून देतो. त्याने सगळे नुकसान भरूनही दिले, माफी मागत होता. महेशला काही राहवेना. त्याने विचारले, की तुम्हाला धडक देताना कोणीही पाहिले नव्हते. आपणहून कबूल कसे काय केले? हे सगळे टाळू शकला असतात. तो माणूस म्हणाला, की कोणी बघत नव्हते कसे? भगवंत सगळे बघत असतो आणि रोज पहाटे दर्शन घेऊन माझ्या अंगात एवढाही प्रामाणिकपणा नसेल, तर माणसाला मंदिरात जाण्याचा काय अधिकार?

# देवपूजा करा व प्रासादिक अनुभूती घ्या...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पूजा कर्म, प्रासादिक क्षण अनुभवावा. आपण रोज जी देवपूजा करतो व ती का करत असतो? यामागील शास्त्रीय कारण काय? देवाची जी पूजा केली जाते त्यात देवाला खूश करणे हा उद्देश असला तरी गंध, अक्षता, फुले, धूप, दीप, उदबत्ती याने पूजा करण्यामागे शास्त्र आहे. शास्त्रोक्त पूजा केल्याने आपली भाववृद्धी होऊन ईश्वराचे अस्तित्व जाणवते. नित्य पूजेत वापरण्यात येणारे घटक, पूजेच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व.

**स्नान**

सर्वप्रथम आपण देवपूजा करताना देवघर स्वच्छ पुसून घेतो. त्यामुळे देवघरातून सकारात्मक ऊर्जा मोठ्या प्रमाणात प्रक्षेपित होते. आपण पूजत असलेल्या देवतांच्या मूर्तीत पवित्र लहरी याव्यात, मूर्तीवर चढलेली रजतमांची अपवित्र लहरींची पूट काढून टाकण्यासाठी देवांना नित्य स्नान घालणे आवश्यक आहे.

**गंध (चंदन)**

सर्व देवता गंधानुगामी असतात. म्हणजे गंधाकडे आकर्षित होतात. देवतांच्या आपल्या पूजेतील मूर्तीत आकर्षित होऊन राहावे यासाठी देवतांना चंदन लावतात.

**अक्षता**

न तुटलेले तांदूळ म्हणजे अक्षता. देवांना अक्षता वाहिल्यावर देवांची शक्ती त्या अक्षतांकडे आकर्षित होते. वाहिलेल्या अक्षतांमध्ये त्या देवांची कंपने निर्माण होतात. गणेशमूर्ती, कलश अथवा कोणत्याही देवतांची मूर्ती ठेवताना मूर्तीखाली तांदूळ ठेवतात. त्या तांदळात देवांची कंपनशक्ती येते. हे तांदूळ नंतर रोजच्या तांदळात मिक्स करून भात खाल्ल्यास ती शक्ती आपल्यालाही मिळते.

**फुले**

विशिष्ट रंगाकडे त्या-त्या देवता आकर्षित होतात. उदा.- गणपतीबाप्पा लाल रंगाकडे, भगवान शंकर पांढऱ्या रंगाकडे, भगवान विष्णू पिवळा रंग इत्यादी. कोमेजलेल्या फुलांचा रंग बदलतो म्हणून तशी फुले देवाला वाहू नये.

**हळद-कुंकू**

कुंकू हळदीपासून बनवितात. हळद पृष्ठभागाखाली निर्माण होते म्हणून जमिनीवर वाढणाऱ्या वनस्पतीपेक्षा हळदीत भूमी लहरी जास्त असतात, असे पृथ्वीतत्त्व असलेले हळद-कुंकू वाहिल्याने मूर्तीतील दैवी लहरी जोरात प्रक्षेपित होतात. पृथ्वीवरील अनिष्ट शक्तींचा त्रास होत नाही. पूर्वीच्या काळी स्त्रिया ठसठसशीत कुंकू लावत. पुरुषही टिळा लावूनच बाहेर पडत.

**धूप**

धूप हे सुवासिक वायुरूप द्रव आहे. या सुगंधामुळे देवता पूजास्थळी आकर्षित होतात. धुपाने घरातील नकारात्मक ऊर्जा नष्ट होते. म्हणून सकाळ-सायंकाळ धूप उदबत्तीने पूजन करावे.

**दीप**

खरी पूजा आत्मज्योतीनेच करायची असते. निरांजनात गाईच्या तुपात वात पेटवून देवांना ओवाळतात. तुपाच्या दिव्यातून निघणाऱ्या लहरी सूक्ष्म असल्याने त्या अतिसूक्ष्म अशा देवतांच्या लहरी अकृष्ट करू शकतात.

**आरती**

आरती करताना घंटा व इतर वाद्ये वाजवतात. त्यामुळे मूर्तीत आलेली देवतांची शक्ती बाहेर प्रक्षेपित व्हायला मदत होते. वाद्ये तालात वाजवावीत. आरती सूरात म्हणावी.

**नमस्कार**

नमस्कार करताना हाताचे तळवे एकमेकांना जोडले जातात. त्यामुळे एक विशिष्ट मुद्रा तयार होते. या मुद्रेमुळे आपण देवतांकडून येणाऱ्या शक्ती, लहरी जास्त प्रमाणात ग्रहण करू शकतो.

# जय गुरू आदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**१) निर्गुण म्हणजे कोण?**

निर्गुण म्हणजे ज्याला कुठलाही गुण नाही. जसे की हास्य, दुःख, सुख, आनंद, निद्रा या उपाधी हे नकारात्मक आणि सकारात्मक कुठलेही गुण ज्याच्या अंतरी नाही त्याला निर्गुण म्हणावे. निर्गुण हे स्वरूप आहे आणि निर्गुण हा परमेश्वर आहे. निर्गुण हेच तत्त्व आहे जे अनंतरूपात व्यापक आहे.

**२) सगुण साकार म्हणजे कोण?**

जो सहस्त्र रूपांनी, सहस्त्र गुणांनी आणि हजारो लक्षावधी भावांनी नटलेला आहे, ज्याच्यामध्ये सहस्त्र गुण आहेत त्याला सगुण म्हणतात. जो सहस्त्र रूपे धारण करू शकतो त्याला सगुन म्हणतात.

**३) निराकार म्हणजे कोण?**

ज्याला कुठलाही आकार नाही त्याला निराकार म्हणतात.

**४) निर्विकार म्हणजे कोण?**

ज्याला कुठलेही विकार नाहीत, काम, क्रोध, मोह, माया, लोभ, स्वार्थ, गर्व, अहंकार, झोप, तहान, भूक इत्यादी कुठल्याही उपाधी ज्याच्या अंतरी नाहीत, कुठलेही विकार ज्याला शिवत नाही त्याला निर्विकार म्हणतात.

**५) निर्भेद म्हणजे कोण?**

ज्याच्या आंतरिक कुठलाही भेद नाही, कुणाविषयी द्वैतभाव, दुजाभाव नाही तो आणि मी एकच आहे हा समरसभाव ज्याच्या अंतरी आहे त्याला निर्भेद म्हणावे.

**६) अलक्ष म्हणजे कोण?**

ज्याच्याकडे कोणाचेही लक्ष जात नाही, असा निर्गुण, निराकार परमात्मा ज्याच्याकडे आपल्याला लक्ष देऊन पाहणे आहे, असा अलक्ष निर्गुण, निराकार परमेश्वर त्याला अलक्ष म्हणतात.

**७) निरंजन म्हणजे कोण?**

निर म्हणजे नाही. अंजन म्हणजे काजळ. ज्याप्रमाणे बिनाकाजळ घालताही जो सर्व काही पाहू शकतो, सर्व काही ज्याला स्पष्टपणे दिसते अर्थातच निरंजन म्हणजे जो सर्वत्र पाहू शकतो. त्याच्या प्रकाशाने विश्व प्रकाशित होते. त्याच्यापासून सृष्टीचा आरंभ आहे. परंतु त्याला कुठलाही आरंभ नाही, कुठलाही जन्म नाही, त्याच्यापासून जन्म-मृत्यू आहेत. परंतु त्याला स्वतःला जन्म-मृत्यू नाही असा निर्गुण, निराकार, निर्विकार, निरंजन, अलक्ष परमेश्वर त्याला निरंजन म्हटले गेले.

**८) आदेश म्हणजे काय?**

आ म्हणजे आत्मा. दे म्हणजे देवो. श म्हणजे शिव. आत्मा हाच देव आहे. हा शिव आहे याचे स्मरण करून देणारा हा आदेश शब्द.

**९) गुरू म्हणजे कोण?**

गु म्हणजे अंधकार आणि रु म्हणजे प्रकाश. जो अंधारातून अंधकारातून प्रकाशाकडे नेतो, मायेच्या अज्ञानातून मुढतेमधून निरंजन, निर्विकार परमेश्वराच्या ज्ञानाकडे, प्रकाशाकडे, गूढतेकडे घेऊन जातो त्याला गुरू म्हणावे. तसेच सतगुरू म्हणजे भगवंताचे सत्य गुह्य रूप दाखविणारे सद्गुरू होय.

**१०) प्रपंच माया म्हणजे काय?**

आपण अनेकदा म्हणतो, की अध्यात्म करण्यासाठी संन्यास घेणे आवश्यक आहे किंवा प्रपंच त्यागणे आवश्यक आहे. प्रपंच माया त्यागणे म्हणजे प्रपंच त्यागणे असे आपण मानून घेतो. परंतु संसार, प्रपंच म्हणजे सारासार ही सृष्टी आणि या सृष्टीमध्ये असणारा भोवतालचा सर्व पसारा. हा पसारा आपण जन्माला येण्यापूर्वीही येथेच होता, मेल्यानंतरही येथेच राहणार, येतानाही यातील काही आपण घेऊन आलो नाही व जातानाही काही घेऊन जाणार नाही. परंतु जन्माला आल्यानंतर येथे असणारा या संसारिक गोष्टींवर भूलित होऊन हे माझे, ते माझे, आधी मोह, लोभ, स्वार्थ, अहं बाळगणे हे विकार ज्याच्यामधून उत्पन्न होतात त्याला माया म्हटले गेलेले आहे. या सर्वांची उत्पत्ती ही वासनेमधून होते. वासना बुद्धीशी समरस झाली आणि बुद्धीवासनेशी समरस झाली की मग मायेचा खेळ चालू होतो. बुद्धी दुर्बुद्धीहीन होऊन जाते आणि वासनेच्या मागे-मागे प्रत्येक गोष्टीचा लोभ मोह धरू लागते. परंतु अंतक्षणी ज्याप्रमाणे वांजवृक्षाला कितीही पाणी घातले तरी त्याला फळे लागत नाही त्याप्रमाणे या सृष्टीत कशाचा जरी मोह धरला किंवा कुणासाठी एखाद्या व्यक्तीसाठी किंवा एखाद्या गोष्टीसाठी कितीही झटले तरी अंतक्षणी शेवटी एकट्यालाच आपले कर्म सोबत घेऊन जाणे आहे, हे जीवनाचे मूळ मर्म आहे. त्या वांजवृक्षासारखे प्रपंच वृक्षाला कधीही फळप्राप्त होत नाहीत. अध्यात्म करण्यासाठी प्रपंच त्यागणे नव्हे; तर प्रपंच माया त्यागणे आवश्यक आहे. प्रपंच आपल्या जागी स्थिर आहे. परंतु आपण त्या प्रपंचाच्या अवतीभवती मोह व लोभ धारण करून फिरत आहोत. ही फिरती लोभ व मोहाची माया, विकारांची माया अर्थातच विकार त्याने अर्थात संसारमाया त्यागणे होय. यासाठी तुम्हाला प्रपंच सोडणे नाही. प्रपंचामध्ये राहून या सर्व गोष्टींचा लोभ, मोह त्यागून देणे अर्थात प्रपंच माया त्यागणे आहे. दिवसभरातील २४ तासांत एक क्षण अर्थात ज्याला ज्याप्रमाणे वेळ भेटतो त्याप्रमाणे भगवंताशी समरस होण्यासाठी वेळ देणे या प्रपंच मायेपासून बाजूला होणे व एकाग्र चित्ताने फक्त भगवंताचे सद्गुरूंनी दिलेल्या बीजमंत्राचे स्मरण करणे अर्थातच अध्यात्म सेवा करणे.

**११) विरक्ती म्हणजेच कशातही असक्त**

नाम हेच परमेश्वराची भेट करवून देईल. गंगेचा किंवा इतर कोणत्याही नद्यांचा उगम जर आपण पाहिला, तर एक-एक थेंब स्वच्छ पाणी तेथून खाली पडत असलेले आपल्याला दिसेल. पूर्वपुण्याईमुळे आयुष्यात परमार्थाचा उगमही असाच लहान पण अगदी स्वच्छ असतो. पुढे त्या स्वच्छ झऱ्याचे नदीत रूपांतर होते आणि अनेक ठिकाणांहून वाहत आल्याने तिचे पाणीही काहीसे गढूळ बनते. तसेच आपले जीवनही व्यवहारातील बऱ्या-वाईट गोष्टींच्या सान्निध्यामुळे पुढे गढूळ बनत जाते. परंतु ज्याप्रमाणे पाण्याला तुरटी लावली म्हणजे पाणी स्वच्छ होऊन सर्व गाळ तळाशी राहतो, त्याप्रमाणे कोणतेही काम करताना नाम घेतले तर त्या कर्माचे गुणदोष तळाशी बसून, वर निर्मळ जीवनाचा प्रत्यय येतो. कोणीही दाढीवाला साधू येऊन सांगू लागला, की परमार्थ असा आहे, तसा आहे, तर तुम्ही खुशाल छातीवर हात ठेवून सांगा, की नामाशिवाय परमार्थच नाही. कर्म करताना नाम घेऊन समाधानात राहणे हाच खरा परमार्थ. भगवंताचे प्रेम यायला, त्याच्याबद्दल आपलेपणा वाटायला, नामासारखे साधन नाही. आपलेपणाचे प्रेम किती असते पाहा. एक मुलगा आईजवळ राहत होता. पुढे त्याचे लग्न झाले. त्याने बायको आपली मानली, तिच्याबद्दल त्याला प्रेम उत्पन्न झाले. पुढे ती जरा कृश झाली. त्याला वाटले, ही शहाणी आहे, बोलत नाही, परंतु हिला आपल्या आईचा जाच असला पाहिजे. म्हणून तो वेगळा निघाला. आपले म्हटल्याने केवढे प्रेम उत्पन्न होते पाहा. तेव्हा परमेश्वर आपलासा होण्यासाठी नामाच्या योगाने त्याच्यापाशी आपलेपणा निर्माण केला पाहिजे. रामाचे प्रेम हे त्याच्या नामाच्या संगतीनेच येऊ शकेल. नुसते पुस्तक वाचून परमार्थ सांगणारे भेटतील, पण आचरणात आणून सांगणारे विरळाच. किती, किती म्हणून प्रपंच केला तरी अपुराच पडतो. एखादा म्हातारा माणूस आपण पाहिला तर त्याचा संसार खरे पाहू जाता सर्व झालेला असतो. मुले-बाळे असतात, सर्व तऱ्हेने तो सुखी असतो. परंतु मरणसमयी म्हणतो, नातवाची मुंज पाहिली असती तर बरे झाले असते. माणूस वासनेत कसा गुंतलेला असतो ते यावरून कळेल. संसार कितीही केला तरी तो पुरा होऊ शकत नाही, तो अपूर्णच राहतो. मनुष्याच्या जीवनाची तळमळ परमेश्वरप्राप्तीशिवाय शमूच शकत नाही. त्याच्या जीवाला समाधान एका परमेश्वरभेटीतच मिळू शकते आणि याकरिता आयुष्याच्या सुरूवातीपासूनच नामाची कास धरा. हेच नाम मृत्युसमयी तुम्हाला परमेश्वराची भेट करवून देईल याची पूर्ण खात्री बाळगा. अत्यंत गुह्यातील गुह्य जे आहे ते मी तुम्हाला सांगतो. नामाचे प्रेम हेच ते गुह्य होय. आपण मागितलेले भगवंत पुरवू लागला, तर त्याला आपल्यासाठी चोवीस तास राबावे लागेल आणि इतके करून आपले अपुरेच राहील.

